# जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी

## तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक यांचे समोर

**(महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ मधील नियम १० (४) अन्वये ठराव व दुरुस्ती)**

---

वाचावे :-**महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ मधील नियम १० (४) मधील तरतुद**

| | |
|---|---|
| १) कै. नितिन वेणुनाथ गोलेकर विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. मर्या. खर्डा ता. जामखेड | **अर्जदार** |
| २) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर | **प्रतिवादी क्रं.०१** |
| ३) सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, जामखेड | **प्रतिवादी क्रं.०२** |

**(या बँकेची संचालक मंडळ पंचवार्षिक निवडणुक कालावधी सन २०२०-२५ साठी दिनांक ७/०१/२०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या अंतिम मतदार यादीतील मयत प्रतिनिधीचे नावात बदल करण्याबाबत नियम १० (४) नुसार प्राप्त झालेल्या ठरावा बाबतची सुनावणी)**

**प्रस्तावना** -

दि अहमदनगर डिस्ट्रीक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बॅक लि., अहमदनगर या बँकेची संचालक मंडळ पंचवार्षिक निवडणुक कालावधी सन २०२०-२५ साठीची निवडणुक प्रक्रिया सुरु झालेली असुन प्रस्तुत निवडणुक प्रक्रियेत बँकेची मतदारांची अंतिम मतदार यादी या कार्यालयामार्फत दिनांक ०७/०१/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने उपरोक्त नमुद अर्जदार सभासद संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ मधील नियम १० (४) नुसार त्यांचे दरम्यानचे काळात मयत झालेल्या प्रतिनिधीचे. नाव बदलण्यासाठीचे ठराव जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांचे कार्यालयाकडुन या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. त्याअनुषंगाने सर्व संबधितांना या कार्यालयाने दिनांक २०/०१/२०२१ रोजी सुनावणी देऊन दाखल केलेल्या ठरावांची व कादपत्रांची पडताळणी केलेली आहे.

**निष्कर्ष व अभिप्राय** —

उपरोक्त अर्जदार कै. नितीन वेणुनाथ गोलेकर विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., खर्डा, ता. जामखेड या संस्थेने यापुर्वी बँकेच्या प्रारुप मतदार यादी वेळी खर्डा विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., खर्डा या नावाने श्रीमती पदमिनी वेणुनाथ गोलेकर यांचे नावाचा प्रतिनिधीचा ठराव दाखल केलेला होता त्यामुळे बँकेच्या प्रारुप व अंतिम मतदार यादीत संस्थेचे नाव खर्डा विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित, खर्डा असे नमुद आहे. तथापि, संस्थेच्या प्रतिनिधी श्रीमती गोलेकर यांचे निधन झाल्याने संस्थेने निवडणुक नियम १० (४) नुसार नविन ठराव दाखल केलेला असुन त्यात संस्थेच्या नावात बदल केलेला आहे. याबाबत खात्री केली असता, संस्थेने सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, जामखेड यांचेकडील दिनांक १६/१०/२०१९ रोजी पोटनियम दुरुस्ती करुन संस्थेचे नाव कै.नितीन वेणुनाथ गोलेकर विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित, खर्डा असे दुरुस्त केलेले आहे. सदरची दुरुस्ती यापुर्वीचे ठरावा आगोदरच केलेली असल्याने संस्थेच्या नावाबाबत विहित मुदतीत संस्थेने प्रारुप मतदार यादीवर विहित मुदतीत हरकत घेतलेली नसल्याने बँकेच्या अंतिम मतदार यादीत सद्यस्थितीत संस्थेच्या नावात बदल करणे कायदेशीर ठरत नाही. तथापि, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर व सहाय्यक निबधंक, सहकारी संस्था, जामखेड यांचे अभिप्रायानुसार संस्थेच्या अंतिम मतदार यादीतील नमुद नावापुढे निवडणुक नियम १०(४) अन्वये प्रतिनिधी बदलाचा नविन ठरावान्वये **श्री शिवाजी प्रकाश भोसले** यांचे नाव समाविष्ट करणे कायदेशीर ठरते. त्यास अनुसरुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे

-कृ.मा.प..

## - आदेश -

१. मी डॉ ज्योती लाठकर, जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी, तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक मला महराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ मधील नियम १० (४) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त् अर्जदार संस्थेंचा ठराव मान्य करण्यात येत आहे.

२. अर्जदार संस्था कै.नितिन वेणुनाथ गोलेकर विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., खर्डा या संस्थेने नावात केलेला बदल अमान्य करण्यात येऊन अंतिम मतदार यादीत नमुद यापुर्वीचे खर्डा विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित, खर्डा, ता.जामखेड, जि.अहमदनगर या नावासमोर नविन नियुक्त प्रतिनिधीचे नावाचा ठराव मान्य करण्यात येत आहे.

३. बँकेच्या संचालक मंडळ निवडणुकीसाठी प्रसिध्द केलेल्या **प्राथमिक कृषि पतपुरवठा व विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था तसेच धान्य अधिकोष सहकारी संस्था** प्रतिनिधी मतदार संघात सोबत जोडलेलया **परीशिष्ट 'ब'** प्रमाणे खर्डा विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित, खर्डा, ता.जामखेड, जि.अहमदनगर नावासमोरील यापुर्वीचे प्रतिनिधीचे नाव वगळुन नविन ठरावान्वये नियुक्त करण्यात आलेल्या प्रतिनिधीचे नाव समाविष्ट करण्यात येत आहे.

जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी ★ तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक

**( ज्योती लाठकर )**
जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी
तथा विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक

**स्थळ – नाशिक**
**दिनांक – २०/०१/२०२१**

---

४४६ जा.क्र.वि-३/अेडीसीसीबँक/नियम १०(४)/निर्णय/२०२१
विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक
विभाग, नाशिक यांचे कार्यालया, तिसरा मजला,
गृहनिर्माण भवन, गडकरी चौक, नाशिक
दिनांक – २०/०१/२०२१

**प्रत –**

३. अर्जदार / प्रतिवादी.

४. निवडणुक निर्णय अधिकारी दि अहमदनगर डिस्ट्रीक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., अहमदनगर तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,अहमदनगर

२/- उक्त आदेशान्वये सोबतचे **परीशिष्ट 'अ'** प्रमाणे झालेला बदल अंतिम मतदार यादीत ग्राहय धरुन त्या प्रमाणे उचित कार्यवाही करण्यात यावी.

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी –**

३) जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., अहमदनगर

## परीशिष्ट-ब

दि अहमदनगर डिस्ट्रीक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बॅक लि., अहमदनगर पंचवार्षिक निवडणुक कालावधी सन २०२०-२१ ते २०२५-२६

**(गट — अ - प्राथमिक कृषि पतपुरवठा व विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था तसेच धान्य अधिकोष सहकारी संस्था मतदार संघ)**

महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक )निवडणुक नियम, २०१४ मधील नियम १० (४) नुसार पुर्वीचे प्रतिनिधी नाव वगळुन नविन प्रतिनिधीचे नाव समाविष्ट करणे

| तालुका | अंतिम मतदार यादीतील अ.क्र. | सभासद संस्थेचे नाव | वगळावयाचे प्रतिनिधीचे नाव | नव्याने समाविष्ट करावयाचे प्रतिनिधीचे नाव | लिंग | वय | पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| जामखेड | ८ | खर्डा विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., खर्डा | गोलेकर पदमिनबाई वेणुनाथ | भोसले शिवाजी प्रकाश | पु. | ३८ | मु पो खर्डा |

( ज्योती लाठकर )
जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी
तथा विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक